# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 16/07/2021 (शुक्रवार)

(दुपार)

---

### अवैधरीत्या देशी दारुची
### वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
### पोलिस स्टेशन सावनेरची कार्यवाही

दिनांक 15/07/2021 रोजी सायंकाळी 17.30 वा. दरम्यान मिळालेल्या गुप्त बातमीदाराच्या खबरेवरून उपविभागीय पोलीस अधिकारी सावेनर विभाग श्री अशोक सरंबळकर व पोलिस निरीक्षक श्री मारोती मुळुक यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे. सावनेर येथील पोलिस पथकाने मौजा पाटणसावंगी येथील रेल्वे क्रॉसिंग खापा रोडवर नाकाबंदी करून शिफातीने एम.एच–40/बीजे– 7306 क्रमांकाची हुंडाई क्रेटा कार ला थांबवून वाहनाचा चालक आरोपी नामे– 1) राहुल बाबाराव साहारे, वय 32 वर्ष, रमाई नगर कोराडह ता. कामठी, 2) सलमान नजिर खान वय 30 वर्ष, रा. सैय्यद बाबा दरगाह नागपूर व 3) प्रकाश लक्ष्मणराव तांबे, वय 21 वर्ष, रा. गौतम नगर जुनी छावणी कामठी यांना विचारपुस करून, वाहनाची झडती घेतली असता नमुद कारच्या डिक्की मध्ये भिंगरी देशी दारू एकुण 15 पेटया कि. 46,800/–रू. चा माल मिळुन आला. आरोपीतांच्या ताब्यातुन देशी दारू व एम.एच–40/बीजे– 7306 क्रमांकाची हुंडाई क्रेटा कार कि. 9,00,000/–रू. असा एकुण किंमती 9,46,800/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम 65 (अ)(इ) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक राहुल माकणीकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावेनर विभाग श्री अशोक सरंबळकर व पोलिस निरीक्षक श्री मारोती मुळुक यांचे मार्गदर्शनात, सहायक पोलीस निरीक्षक श्री. निशांत फुलेकर, पोलीस हवालदार क्रिष्णा जुनघरे, कुमेरिया, बांबल, कोल्हे यांनी पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर